बीड । रविवार

२०.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : २०

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955





# नारळी सप्ताहाच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## घाटशीळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्र्यांची उपस्थिती







**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याला नारळी सप्ताह, अध्यात्म व विचारांची मोठी परंपरा लाभली आहे. संत वामनभाऊ यांनी सुरू केलेली सप्ताहाची परंपरा अखंडपणे ९३ वर्ष सुरू आहे. या परंपरेच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. गहिनीनाथ गडाचा विकास करताना बीड जिल्ह्याला पाणीदार जिल्हा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिरूर कासार तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ९३ व्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, म ठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, आ. सुरेश धस, आ. नमिता मुंदडा, आ. मोनिका राजळे, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार भीमराव धोंडे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, जिल्हाधिकारी अविनाश पाठक उपस्थित होते.

श्री. फडणवीस पुढे म्हणाले, गहिनीनाथ गडाच्या विकासाचे काम सुरू केले आहे व अजून पुढे विकासाची ही कामे करायची आहेत. संतानी दाखविलेला भक्तीचा मार्ग समाजाने सोडलेला नाही. समाज घडविणाऱ्या या परंपरेत समाजातील सर्व घटकांचा सहभाग दिसून येत आहे. यामध्ये मुस्लिम समाज बांधव देखील ▶▶ उर्वरित पान २ वर

# बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासलेचा खरा चेहरा उघड

- उसने म्हणून १० लाख रुपये खात्यावर पाठवलेले गुत्तेदार सुदर्शन काळे यांची पोलिसात तक्रार
- मुलाच्या फी भरण्यासाठी डिसेंबर महिन्यात घेतले होते पैसे, पुराव्यांसह काळेची तक्रार
- याच दहा लाखांवरून कासले करत होता भलतेच आरोप, सर्व आरोप खोटे निघाले

**बीड । प्रतिनिधी**

बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याचा आणखी एक कारनामा उघड झाला आहे. रणजित कासले स्वतःच्या खात्यावर दहा लाख रुपये धनंजय मुंडे यांच्या माणसांनी पाठवले असे सांगत होता, ते पैसे मुळात अंबाजोगाई येथील संत बाळू मामा कन्स्ट्रक्शन चे मालक सुदर्शन काळे यांनी पाठवले असल्याचे उघड झाले आहे.

याबाबत आता सुदर्शन काळे यांनीच स्वतः पोलिसात पैसे दिल्याच्या पुरावा सहित तक्रार दाखल केली आहे. रंजीत



कासले हा पोलीस उपनिरीक्षक असताना मागील वर्षी अंबाजोगाई येथे कार्यरत होता, त्या काळात आपली त्याच्याशी ओळख झाली. डिसेंबर २०२४ मध्ये रणजीत कासले याने आपल्या लातूर येथे शिक्षण घेत असलेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# कोट्यावधीची स्कीम देणारा बंगाली बाबू आर्थिक संकटात !

● शहर पोलीस ठाण्यात ३० लाखांची फसवणूक प्रकरणी अर्ज दाखल असल्याची चर्चा

**● बीड करांना बसू शकतो मोठा शॉक ; जागो ग्राहक जागो च नारा !**

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्याला चुना लावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. इन्शुरन्स कंपनी पासून समृद्धी योजना ते मल्टीस्टेट पासून स्कीम देणाऱ्या अनेक व्यक्तींनी बीडकरांना आर्थिक खाय लोटले आहे. अमिषा पोटी बीड जिल्ह्यातील जनता पुन्हा पुन्हा या लोकांच्या मायाजाळात अडकते. मल्टीस्टेट घोटाळ्यानंतर बीड शहरात एका ज्वेलरी चालकाने अनेक अधिकारी व जवळच्या मित्रांना अधिक व्याज व सोन्याचे अमिष दाखवत कोट्यवधी रुपयांना चुना लावला. बीड शहरात मोठ्या गाजा वाजा करत चार चाकी वाहनापासून बुलेट देण्यापर्यंत लोकांना मोठ्या आमिषेला बळी पाडण्यात आले आहे. शहरातील एका बंगाली बाबू ने बीड जिल्ह्याला अक्षरशः वेड लावले आहे. याचा पापाचा घडा भरत आला असून एका ज्वेलरी चालकाने तब्बल तीस ▶▶ उर्वरित पान २ वर

# किरकोळ वाद, चिडलेल्या भावाने सात वर्षांच्या बहिणीला कटरने ठार केलं

**पालघर । प्रतिनिधी**

वसईमध्ये गुरुवारी घडलेली हत्येची एक हृदयद्रावक घटना आता चक्रावून टाकणाऱ्या वळणावर आली आहे. सात वर्षीय अंजली मिथुन शर्मा या चिमुरडीचा मृत्यू अपघात नसून तिच्या १२ वर्षीय भावानेच हत्या केल्याचे उघडकीस आले आहे. किरकोळ वादातून हा धक्कादायक प्रकार घडल्याची माहिती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश कुराडे यांनी दिली आहे. ही घटना गुरुवारी १७ एप्रिल रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास वसई पूर्व येथील पेल्हार परिसरात घडली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# माजलगाव पंचायत समिती अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांच्या लुटी संदर्भात संतोष रासवे यांची मुख्यमंत्र्याकडे तक्रार



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव पंचायत समिती अंतर्गत गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक यांच्या आशीर्वादाने पंतप्रधान घरकुल आवास योजनेतील लाभार्थ्यांची मोठ्या प्रमाणात लूट चालू होती या संदर्भात अनेक वेळा तक्रारी करूनही मुळीच फरक पडत नव्हता म्हणून संतोष रासवे यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्याकडे तक्रार केली आहे.

निवेदनात संतोष रासवे यांनी सांगितले आहे की माजलगाव पंचायत समिती अंतर्गत पंतप्रधान घरकुल आवास योजनेचे अनेक गावात कामे चालू आहेत अनेक लाभार्थ्यांनी पंतप्रधानाच्या आव्हानाला साथ देत आपल्यालाही निवारा मिळाला पाहिजे पंतप्रधान घरकुल आवास योजनेतील लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज केले आहेत घरकुल लाभार्थ्यांची मंजूर यादी प्रकाशित झाले आहे मात्र माजलगाव पंचायत समिती अंतर्गत असणाऱ्या गंगामसला सर्कलमध्ये गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक मॅडम यांच्या अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे प्रायोगिक तत्त्वावर काम करणाऱ्या एका गात नावाच्या इंजिनिअरने लाभार्थ्यांकडून पैसे घेतल्याशिवाय कुठलेच ▶▶ उर्वरित पान २ वर

# अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत असंख्य तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

## एकनाथजी शिंदे सर्वसामान्यांचा आधार- अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**



हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटक दगडू दादा गायकवाड यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ, सूरज गायकवाड, अमित गायकवाड, शुभम आखाडे, संदेश सावंत, विशाल उबाळे, दामोदर डोळस, किशोर जाधव, भरत जाधव, सुमित जाधव, वसंत जाधव, प्रशांत दुधाळ, प्रितम दुधाळ, दिपक भराटे, महेश नेवडे, गोपाळ आखाडे, सुशील दुधाळ, औदुंबर दुधाळ, नितिन शेवाळे, दत्ता राऊत, विनोद गायकवाड, रवि दुधाळ, अविनाश कुऱ्हाडे, सोहेल गायकवाड, विनोद गायकवाड, तेजस नाळे, सोनू सुरवसे, अविष्कार दुधाळ, अनय गायकवाड, राम अंकुशे, सचिन अंकुशे, श्याम अंकुशे, प्रतिक दुधाळ, निवास रोकडे, संघर्ष डोंगरे, सौरभ राऊत, बबलू घुमरे, अतुल जगताप, शैलेश आगलावे, दीपक बोबडे यांनी काल दि. १९ रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोडबीड येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटक दगडू दादा ▶▶ उर्वरित पान २ वर

# भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदाच्या तयारीसाठी सुवर्णसंधी ; एसएसबी कोर्ससाठी मोफत प्रशिक्षण

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्याची इच्छा असलेल्या महाराष्ट्रातील युवक-युवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिनांक ५ मे ते १४ मे २०२५ या कालावधीत एसएसबी (SSB) कोर्स क्र. ६१ आयोजित करण्यात आला आहे. या कोर्समध्ये प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास आणि भोजनाची सोय करण्यात आली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, मुंबई शहर येथे ▶▶ उर्वरित पान २ वर



# तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दर्जेदार आरोग्यसेवा दुर्गम भागांपर्यंत पोहोचवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आरोग्यसेवेच्या सुविधांसाठी महाराष्ट्र एक महत्त्वपूर्ण केंद्र बनले आहे. राज्यात सर्व प्रकारच्या दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध आहेत. ही गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत, अतिदुर्गम भागात राहणाऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी डॉक्टरांची, तज्ञांची मदत आवश्यक असून आजच्या तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण या शेवटच्या व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवू शकतो, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत २२ व्या मुंबई लाईव्ह इंडोस्कोपी अवॉर्ड २०२५ चे वितरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत




होते. यावेळी डॉ.अमित मायदेव, डॉ. तरंग ग्यानचंदानी, देश विदेशातील डॉक्टर्स आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, देशातील प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळणे अत्यंत गरजेचं असून दर्जेदार आरोग्यसेवा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. गेल्या दोन



वर्षांमध्ये महाराष्ट्रात दहा नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात डॉक्टरांची व आरोग्य सेवकांची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. इंडोस्कोपी क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या डॉक्टरांचा यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला आहे. यात महाराष्ट्रातील डॉ.राधिका चव्हाण यांना 'वूमन इन इंडोस्कोपी' अवॉर्ड, चंडीगड येथील डॉ. सुरेंदर राणा यांना 'इंडोस्कोपी एज्युकेटर' अवॉर्ड, ओडिशाचे डॉ.आशुतोष मोहपात्रा यांना 'लीडर फ्रॉम टायर २ / ३ सिटीज' अवॉर्ड, राजस्थानचे डॉ.मुकेश कल्ला यांना 'लीडरशिप' अवॉर्ड, चंडीगड येथील डॉ.जयंत सामंता यांना 'इम्पॅक्टफुल पब्लिकेशन' अवॉर्ड, महाराष्ट्राचे डॉ. अमोल बापये आणि तेलंगणा येथील डॉ. मोहन रामचंदानी यांना 'टेक्निकल स्कील' अवॉर्ड आणि महाराष्ट्राचे डॉ.प्रवीण सूर्यवंशी यांना 'इंडोस्कोपी फॉर सर्जन' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पान ४ वरून पुढे...

## पंडीत प्रदीपजी मिश्रा ...

असून हा कार्यक्रम भव्य दिव्य स्वरूपात पार पाडण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शहरातील सर्व डॉक्टर मंडळींनी या बैठकीस मोठ्या संख्येने सहभागी होवून हे कार्य सिद्धीस नेण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन शिवपुराण कथा आयोजन समिती आणि महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नगरपालिका प्रशासक....

शहरातील तमाम नागरिकांमधून आपल्याबद्दल व्यक्त होत आहे बीड शहरांमध्ये अनेक ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे शाहूनगर भागामध्ये असोत किंवा बीड शहरातील इतर भागांमध्ये असो मतदानाच्या वेळेस अनेक राजकीय पुढारी त्या ठिकाणी येऊन आम्ही चांगल्या प्रकारे रस्ता करू चांगल्या प्रकारे मुबलक पाणी उपलब्ध करून देऊ या ठिकाणी लाईट चांगल्या प्रकारे उपलब्ध करून देऊ परंतु निवडणुकी संपल्या की सगळं संपलं मग आता शाहूनगर भागामध्ये असो की बीड शहरातील प्रत्येक गल्लोगल्ली मध्ये घाण कचरा साचलेला आहे यामुळे नागरिकांचे आरोग्य देखील धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून निवडणुकीच्या काळामध्ये आपल्या नगर प्रशासनाची घनकचऱ्याची घंटा गाडी आपली विधानसभेच्या किंवा लोकसभेच्या निवडणुका जवळ आल्या की रोज बीड शहरामध्ये प्रत्येक गल्लीमध्ये येऊन कचरा घेऊन जाते परंतु आता या कचऱ्याचे नेमकं काय करायचं आहे ते कुठल्या उपयोगाला नगर प्रशासनाला आणायचा आहे आणि कुठला पुरुषार्थ साध्य करायचा आहे असी देखील चर्चा सध्या बीड शहरातील नागरिकांमधून होत आहे म्हणून स्वच्छ बीड सुंदर बीड अशी लोकांची जी कल्पना आहे ती आपण पूर्ण करावी असी अपेक्षा देखील बिडकर आपल्याकडून व्यक्त करत आहेत आणि आपण येणाऱ्या काही दिवसात मुबलक पाण्याची व्यवस्था बीड शहरासाठी कराल आणि बीड शहरातील नागरिकांना व बीड शहरातील रस्त्यावर फिरणाऱ्या मुक्या जनावरांना देखील मुबलक पाणी उपलब्ध करून द्याल आणि सध्या बीड शहरामध्ये प्रत्येक गल्लीमध्ये ठरल्याप्रमाणे जे वीस दिवसाला किंवा पंधरा दिवसाला बीड शहरामध्ये पाणी येत आहे ते पाणी रोज बिडकरांना आपण मुबलक प्रकारे बीड नगर प्रशासनाच्या वतीने हातपंप दुरुस्त करावेत विहीर आणि इत्यादी तात्काळ दुरुस्त करावे जेणेकरून बीड करणारा मुबलक पाणी मिळेल व बीड शहरातील व बीड नगरपालिका अगदी बाहेरील वार्डामुळे नगरपालिका मार्फत टँकरने मागेल त्याला पाणीपुरवठा तात्काळ उपलब्ध देण्यात यावा नगरपालिका मार्फत शक्तीने घरपट्टी नळपट्टी वसूल करता सुविधा मात्र शून्य तसेच कुत्र्याचा मुक्त संचार बीड शहरामध्ये होत आहे याची गांभीर्याने दखल घेऊन पाणीपुरवठा दररोज स्वच्छ निर्मळ पाणीपुरवठा करावा अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे नेते व माजी नगरपरिषद सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे .

## बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक....

सुरक्षेच्या दृष्टीने शंका उपस्थित करणारे वक्तव्य स्वतः लोकसेवक असताना कासले याने केले असून, त्या विरुद्ध नायब तहसीलदार निवडणूक श्री अण्णा वंजारे यांच्या फिर्यादीनुसार परळी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १७५, ३३६ (४), ३५३ (१- ब), १९८, ३५६ (२), तसेच १९७ (१- ड) या अंतर्गत गंभीर गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास परळी शहर पोलिस करत आहेत. दरम्यान रणजित कासले याने अटक होण्यापूर्वी निवडणूक आयोगाला आव्हान देणारे काही बेजबाबदार वक्तव्ये केली होती, त्यावरून आयोगाने बीड जिल्हा प्रशासनाकडून याबाबतचा अहवाल मागवला असल्याचे समजते. बीड जिल्हा प्रशासनाने निवडणूक आयोगास रणजित कासले याने केलेल्या वक्तव्याबाबत गुप्त अहवाल सादर केला असून, रणजित कासले याला निवडणुकीत काळात बीड सायबर विभागात नेमणूक दिलेली होती, त्याची ड्युटी परळी विधानसभा मतदारसंघात नव्हती त्यामुळे त्याचा निवडणूक प्रक्रियेत काहीही संबंध नव्हता, असा अहवाल सादर केला असल्याचे खात्रीलायक सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार समजले आहे. तर दुसरीकडे रणजित कासले ज्या दहा लाख रुपयांची गोष्ट सांगत हे सगळे आरोप करत होता, ते दहा लाख रुपये अंबाजोगाई येथील संत बाळूमामा कन्स्ट्रक्शन चे संचालक सुदर्शन काळे यांच्या कडून कासले याने मागून घेतले होते तसेच त्यातून साडे सात लाख रुपये आतापर्यंत काळे यांना परत दिले असून आणखी उरलेले अडीच लाख रुपये परत द्यावेत यासाठी सुदर्शन काळे यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात तक्रार दिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे स्वतःच नशेत वक्तव्ये करतो असे विधान करणाऱ्या रणजित कासले याने केलेली वक्तव्ये निराधार खोटी आणि केवळ सनसनाटी निर्माण करायच्या उद्देशाने केलेले होते हे आता स्पष्ट झाले आहे.

## आदित्य कृषी...

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षिकाद्वारे प्रत्येक विषयाचा बारीक अभ्यास व्हावा. त्यांना भविष्यात त्या विषयाचे ज्ञान आपल्या करिअरसाठी उपयुक्त व्हावे यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा हे नेहमीच प्रयत्न करत असतात.

## बुलढाणा अर्बन...

याप्रसंगी माननीय राधेश्यामजी चांडक ( भाईजी ) बुलढाणा यांनी सर्व बीड करांना बीड जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी असलेल्या गोशाळेंना सर्व नागरिकांनी गुळ , पेंड , चारा देण्याचे आवाहन सुद्धा त्यांनी केलेले आहे .कारण भारतीय संस्कृतीमध्ये गाईला खूप अन्यसाधारण महत्त्व आहे गायीची केलेली सेवा कधीही वाया जाणार नाही अशी त्यांनी भावना व्यक्त केली .आज बीड येथील बुलढाणा अर्बन बँकेचे माननीय संजय नानासाहेब देशमुख विभागीय व्यवस्थापक व बीडची शाखा व्यवस्थापक सतीशजी जाधव व त्यांचे कर्मचारीवृंद व गोसेवक गौतम खटोड उपस्थित होते . अध्यक्ष विजयराज बंब यांच्याकडे गोशाळेमध्ये सर्वांनी मिळून पेंड सुपूर्द केली व आज पहिल्या दिवशी १५० किलो पेंड तेथे असलेल्या गाईंना गोग्रास देण्यात आला.

## तेलगाव वीज...

खुपच भयानक आग दिसत होती. आग पाहण्यास लोकांनी गर्दी केली होती. परंतु उपकेंद्रात ऑईल व इतर स्फोटक पदार्थ असल्याने आगीच्या जवळ जाणे ही धोकादायक होते. फोन करताच कारखान्याचा अग्नीशमन बंब कांही वेळात घटनास्थळी दाखल होऊन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करत होता. तसेच विज कर्मचारी आग आटोक्यात आणण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न करत होते.मात्र आग आटोक्यात येत नव्हती. आगीमुळे अकाशात धुरांचे लोटच्या लोट दिसत होते.

## अहो आमदार महोदय ...

जीवाचे रान केले आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकांचे मतें मन परिवर्तन केलें अशा कार्यकर्त्याला टार्गेट करतात हे शोभत नाही म्हणून वरिष्ठ पक्षातील नेत्यांनी या प्रकरणाकडे लक्ष्य घालावे गेवराई विधानसभा निवडणुकीच्या काळात पत्रकार नवनाथ आडे यांनी तसेच त्यांचे कुटुंबीयांनी आमदार विजयसिंह पंडित यांच्या पाठीशी खंबीर होते. परंतु त्या काळात गावातील राजकीय पुढार्यांनी यामध्ये विष पसरविण्याचे काम केले होते. काही दिवसापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत पत्रकार नवनाथ आडे यांचे वडील एकनाथ आडे तसेच चुलते दत्ता आडे या दोन कुटुंबीयांनी मतदान रुपी आशीर्वाद आमदार विजयसिंह पंडित यांना दिलेले आहे. परंतु यामध्ये दोष निर्माण करण्याचे काम गाव पातळीवरील गावातील पुढारी करत आहे. जाणीवपूर्वक अफवा पसरून या आडे कुटुंबीयांनी आपल्या आमदार विजयसिंह पंडित यांना मतदान केले नाही. किंवा त्यांचे काम करत नाहीत पक्षामध्ये नाही. या दोषातून वाद निर्माण करण्याचं काम काही गाव पुढारी करत आहे. तसेच आमचे कुटुंबीय पहिल्यापासून राजकारणात सक्रिय नाही, परंतु मला जेव्हापासून मला राजकारण करत आहे.

पान १ वरून पुढे...

## नारळी सप्ताहाच्या...

सहभागी झाले, याचा आनंद आहे. आमचे नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यामुळे बीड जिल्ह्याशी वेगळे नाते निर्माण झाले आहे. आज मला वामनभाऊंच्या या सप्ताहाच्या परंपरेत सहभागी होऊन आशीर्वाद घेता आला याचा मनस्वी आनंद असल्याचे ते म्हणाले.

गहिनीनाथ गडावर येणाऱ्या प्रत्येक भक्ताची उत्तम व्यवस्था झाली पाहिजे, गडासोबतच या परिसरातील भाविकांच्या सोई सुविधांचा तसेच या परिसराचा देखील विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगून श्री. फडणवीस म्हणाले, मराठवाडा व बीड जिल्ह्याला कायम स्वरुपी दुष्काळमुक्त करण्यासाठी शासनाने कृष्णेचे पाणी आष्टीपर्यंत आणले आहे. ते पाणी संपूर्ण बीड जिल्ह्यात पोचविण्याचा आपला प्रण आहे. मराठवाडा व बीड जिल्ह्याला पाणीदार करण्यासाठी ५३ टीएमसी पाणी गोदाखोऱ्यात आणण्याच्या आराखड्याला देखील मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरातील दुष्काळ कायमचा मिटेल. आजच्या या पिढीने दुष्काळ पहिला, तो पुढच्या पिढीला पाहू देणार नाही, असेही श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ, संत भगवान बाबा यांनी या भागातील लोकांना आध्यात्मिक गोडी निर्माण करणारी सप्ताहाची परंपरा सुरू केली, ती अखंडपणे सुरू आहे. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी तसेच बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री महोदय आपल्यासोबत आहेत, त्यामुळे येत्या काळात बीड जिल्हा नक्कीच सुजलाम, सुफलाम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी गडाचे मठाधिपती विठ्ठल महाराज यांनी संत वामनभाऊ यांनी ९३ वर्षापूर्वी सुरू केलेल्या अखंड नारळी सप्ताह परंपरेबाबत माहिती दिली. यावेळी बीड, अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक...

मुलाच्या फीची अडचण असल्याचे सांगत दहा लाख रुपयांची उसनवारी ने मागणी केली. एका कामाचे बिल आल्यानंतर मी त्यांना त्यांच्या क्सिस बँकेच्या वैयक्तिक खात्यावर ते दहा लाख रुपये पाठवले. विशेष म्हणजे त्यावेळी त्यांनी मला दुसऱ्या एका अनोळखी व्यक्तीच्या खात्यावर पैसे पाठवण्याचा आग्रह केला होता मात्र मी तसे न करता वैयक्तिक त्यांच्याच बँक खात्यावर पैसे पाठवले. त्यांनी लवकरच ते पैसे परत देतो, असे सांगितले होते. साधारण दीड ते दोन महिने उलटल्यानंतर मी त्यांना पैशाची परत मागणी केल्यावर त्यांनी टाळाटाळ केली.

माझे पैसे मला गरजेच्या वेळी परत न दिल्यास मी त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार करणार असल्याचे सांगितले, किंवा त्यांनी गुजरात मधून मला काही रक्कम पाठवली. तसेच सायबर ठाण्यातील गिरी नामक कर्मचाऱ्यांच्या हाताने दोन लाख रुपये, असे तीन वेळा मिळून साडे सात लाख रुपये परत दिले आहेत. तर उर्वरित अडीच लाख रुपये परत मिळवून द्यावेत, अशी मागणीही काळे यांनी आपल्या तक्रारीत केली आहे. सुदर्शन काळे यांनी आपल्या तक्रारी सोबत कासले याला पैसे पाठवल्याचे पुरावे देखील जोडले आहेत. या तक्रारीची दखल घेऊन पोलीस प्रशासन कासले वर काय कारवाई क याकडेही आता लक्ष लागले आहे.

## कोट्यावधीची स्कीम...

लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात या भामट्या विरोधात तक्रार अर्ज दाखल केल्याची चर्चा होत असून अमिष दाखवणारा हा बंगाली बाबू तीस लाख रुपयांचे कर्ज फेडत नसल्याने भविष्यात बीड जिल्ह्यातील जनतेला आर्थिक फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. बीड जिल्ह्यातील जनतेला आपल्या स्कीमद्वारे अनेकांनी गंडा घातला यामध्ये अनेक दिग्गज नावांचा समावेश आहे यातच बीड शहरात मागील अनेक वर्षापासून ठाण मांडून बसलेल्या एका बंगाली बाबुने शहरातील नामकीत लोकांना आपल्या जाळ्यात ओढत स्कीमच्या माध्यमातून गरीब व कष्टकरी जनतेच्या पैशावर डल्ला मारण्याचा प्लॅन केला आहे का ? कोट्यावधी रुपयांची स्कीम देणार आहात बंगाली बाबू तीस लाख रुपयांचे कर्ज फेडत नसल्याने एका ज्वेलरी चालकानेच शहर पोलीस ठाण्यात या बंगाली बाबूच्या विरोधात तक्रारी अर्ज दाखल केला आहे. या तक्रारी अर्जाची चर्चा शहरात दबक्या आवाजात सुरू झाली असून या बंगाली बाबूचा भांडाफोड लवकरच होणार आहे.

## किरकोळ वाद, चिडलेल्या...

अंजली घरी एकटी होती. तिचे आई-वडील कामानिमित्त घराबाहेर गेले होते, तर तिचा भाऊ बाहेर खेळत होता असे सुरुवातीच्या तपासात सांगण्यात आले होते. आधी अपघात झाल्याचं सांगितलं - प्राथमिक माहितीनुसार, अंजलीने किचनमधील ओट्यावर ठेवलेले सामान काढण्यासाठी स्टुलवर चढण्याचा प्रयत्न केला. मात्र स्टुलवरून घसरून ती खाली पडली आणि मानेजवळील भाग किचनच्या पक्कडवर आपटल्यानं गंभीर जखमी झाली. सुरुवातीला ही माहिती पोलिसांना देण्यात आली होती.

शेजाऱ्यांनी तात्काळ अंजलीला वसई-विरार महानगरपालिकेच्या तुळिंज रुग्णालयात दाखल केलं होतं. मात्र, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच तिला मृत घोषित केलं. यानंतर पोलिसांनी अदखलपात्र मृत्यूची नोंद केली होती. शवविच्छेदनासाठी मृतदेह मुंबईतील जे.जे. रुग्णालयात पाठवण्यात आला होता. भावानेच बहिणीला कटरने मारले- या प्रकरणात शवविच्छेदन अहवाल आणि परिसरातील सीसीटीव्ही फूटेज, तसेच तांत्रिक तपासाच्या आधारावर मिरा-भाईंदर वसई-विरार गुन्हे शाखेने तपासाची दिशा बदलली. पोलिसांनी अंजलीच्या १२ वर्षीय भावाची कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. किरकोळ वादातून चिडून त्याने बहिणीला धागा कापण्याच्या कटरने मारल्याचं सांगितलं. या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस करत आहेत. या प्रकरणी बालकाने गुन्हा केल्यामुळे त्याच्यावर बालन्याय प्रणाली अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. पेल्हार पोलिस ठाणे आणि गुन्हे शाखा विभाग यांच्यातर्फे या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. ही घटना केवळ दुर्दैवीच नाही, तर लहान वयात उद्भवणारे तणाव, राग, आणि भावनिक समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज अधोरेखित करणारी आहे.

## माजलगाव पंचायत...

काम करणार नाही असे म्हणून उच्छाद मांडला आहे ही बाब अनेक वेळा वृत्तपत्रातून, तोंडी सूचना देऊन, लेखी सूचना देऊन माजलगाव पंचायत समितीला कळवली मात्र भ्रष्टाचारात बरबटलेले कर्मचारी काही सुधारत नाहीत म्हणून दिनांक १६ /४/ २०२५ रोजी मुंबई येथे मुख्यमंत्र्याकडे रीतसर तक्रार केली आहे सदर निवेदन पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, ग्राम विकास विभागाचे मुख्य सचिव, विभागीय आयुक्त संभाजीनगर, जिल्हाधिकारी बीड, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना देण्यात आलेले आहेत

## अनिलदादा जगताप...

गायकवाड यांनी प्रत्येकाच्या हाती भगवा झेंडा देऊन सर्वांचे शिवसेनेत स्वागत केले. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते बाळासाहेबांच्या विचारांचा रथ यशस्वीपणे ओढत असून त्यांनी आपल्या मुख्यमंत्री काळात सामान्य जनतेसाठी अनेक हितदायी योजनांची उभारणी करत स्वतःला सिद्ध केले आहे. सर्वसामान्यांसाठी त्यांनी अनेक हितदायी योजना उभारल्या. बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार असणारे आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांची ताकद वाढवण्याकरिता आपण सर्व जाती-धर्मातील कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे अशा भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात मांडल्या तर अठरा पगड जातीची वज्रमुठ एकनाजी शिंदे साहेबांची ताकद वाढविण्यासाठी कामी येणार असल्याचे मत शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटक दगडू दादा गायकवाड यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शिवसेना, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय सशस्त्र सैन्यदलात ...

मुलाखतीस हजर रहावे. उमेदवारांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) च्या वेबसाईटवरून SSB-61 कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबतची परिशिष्टे डाउनलोड करून ती पूर्ण भरून, मुलाखतीच्या दिवशी सोबत आणणे आवश्यक आहे. पात्रता- या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडे खालीलपैकी कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे: कंबाईंड डिफेन्स सर्विसेस एक्झामिनेशन(CDSE-UPSC) किंवा नॅशनल डिफेन्स अकेडमी एक्झामिनेशन(ND-UPSC) परीक्षा उत्तीर्ण, तसेच सर्विसेस सिलेक्शन बोर्ड (SSB) मुलाखतीसाठी पात्रता प्राप्त केलेली असावी. एनसीसी 'C' प्रमाणपत्र '' किंवा 'B' ग्रेडसह उत्तीर्ण, आणि एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरकडून एस एस बी SSB साठी शिफारस मिळालेली असावी. टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी Technical Graduate Course साठी SSB मुलाखत पत्र असणे आवश्यक. विद्यापीठ प्रवेश प्रणाली साठी SSB मुलाखत पत्र किंवा शिफारस यादीत नाव असावे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे training. petenashikgmail.com या ईमेल, दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सअॅप ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड मार्फत उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड आणि जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने उन्हाळी प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. १० ते १९ वर्षाखालील मुले व मुली यांच्या सर्वंगिण विकास व्हावा. या दृष्टीने उन्हाळी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन दि. २१ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत सकाळी ०७ ते १० वा. पर्यंत घेण्यात येणार आहे. या शिबिरात सॉफ्टबॉल, बेसबॉल, मैदानी, खो-खो, कबड्डी, क्रीकेट, स्कॅटिंग, तायक्वाँदो, जिम्नॉटिक्स, टेबल टेनिस, कुराश, नेटबॉल, कराटे, हॉकी, व्हॉलीबॉल, योगासन अशा १६ क्रीडा प्रकाराचा समावेश आहे. अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड श्री. अरविंद विद्यागर यांनी दिली.

विविध खेळांचे प्रशिक्षण ठिकाण, प्रशिक्षक व त्यांचा संपर्क क्रमांक पुढील प्रमाणे आहे.

जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथील मैदानावर : १) सॉफ्टबॉल खेळासाठी :- १) श्री. सतिश राठोड, क्रीडा मार्गदर्शक, संपर्क क्र. ९९२३०१९३५३, २) बेसबॉल खेळासाठी :- १) श्री. रेवननाथ शेलार, क्रीडा मार्गदर्शक, संपर्क क्र. ९०७५४७५७९१, ३) मैदानी (ॲथलेटिक्स्) :- १) श्री. अविनाश पाटील, क्रीडा मार्गदर्शक, संपर्क क्र. ९६२३७८११२१ खेळासाठी ४) तायक्वांदो खेळासाठी :- १) श्री. अविनाश बारगाजे, संपर्क क्र. ९२७०९३८००८, ५) क्रिकेट खेळासाठी :- १) श्री. अजहर शेख, संपर्क क्र. ९३३८३८६०६०
२) श्री. निसार तांबोळी संपर्क क्र. ९९६०९९९६२९, ३) श्री. सुनिल वाघमोर, संपर्क क्र. ९३०९१५३३७३
४) श्री. राहूल जाधव, संपर्क क्र. ९९२१६००२१४
६) खो-खो खेळासाठी :- १) श्रीमती. चित्रा आगळे, संपर्क क्र. ८८३०५१९०११
२) श्री. विजय जाहेर, सर्पक क्र. ९४२००३२००४
३) श्री. तुकाराम कंराडे, संपर्क क्र. ९५७९२७८३८५, ७) कबड्डी खेळासाठी :- १) श्री. भिमा माने, संपर्क क्र. ९४२१२८०४३३
२) श्री. नितीन गर्जे, संपर्क क्र. ९७६३४२०४३३, ८) नेटबॉल खेळासाठी :- १) श्री. रामदास गिरी, संपर्क क्र. ९८८११५९६०७
९) स्केटिंग खेळासाठी :- १) श्री. वैभव गिरी, संपर्क क्र. ९०२८५९०४४८, १०) जिम्नॉटिक्स खेळासाठी :- १) श्री. विनायक वझे, संपर्क क्र. ९३२६४०१०२९
११) कुराश खेळासाठी :- १) श्री. शरद आंदुरे, संपर्क क्र. ९५५२७५००६४
१२) कराटे खेळासाठी :- १) श्री. उत्तरेश्वर सपाटे, संपर्क क्र. ९८५०७५२७४१, १३) योगासन खेळासाठी :- १) श्री. उत्तम काळवणे, संपर्क क्र. ९९२२४४६०८३
२) श्रीमती राधा तांबे, संपर्क क्र. ९७६५४१००४४, छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, छ. शिवाजी महाराज चौक, बीड येथे, १४) टेबल टेनिस खेळासाठी :- १) श्री. श्रीकांत व्यवहारे, संपर्क क्र. ९२८४०२८३२८
१५) व्हॉलीबॉल खेळासाठी :- १) श्री. गोपाल धांडे, संपर्क क्र. ९४२२२९९५१०१
२) श्री. सुनिल जगताप, संपर्क क्र. ८६२४९५४३०२
३) श्री. विजय अपशिंगेकर, संपर्क क्र. ९७६३०२८०२२
जिल्हा परिषद कन्याप्रशाला मैदान छ. शिवाजी महाराज चौक, नगर रोड, बीड येथे
१६) हॉकी खेळासाठी :- :- १) श्रीमती क्षिताजा गव्हाणे, संपर्क क्र. ७०२०१४३८८०, २) श्री. अकबर खान संपर्क क्र. ९८५०७२२०९९

वरील प्रमाणे विविध १६ खेळांचे मोफत प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सहभागी होणाऱ्या खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत विहित नमूण्यामध्ये नोंदणी करणे अवश्यक आहे. त्या सोबत जन्म तारखेचा दाखला व आधार कार्डची प्रत जोडणे आवश्यक राहिल. खेळाडुंनी प्रशिक्षणासाठी लागनारे वैयक्तीक क्रीडा साहित्य (किट व इतर साहित्य) हे स्वतः आनावे लागेल. अधिकच्या माहिती करिता क्रीडा मार्गदर्शक श्री. सतिश राठोड, (मो. न. ९९२३०१९३५३) श्री. अविनाश पाटील (मो. न. ९६२३७८११२१) श्री. रेवननाथ शेलार (मो. न. ९०७५४७६७९१) यांच्याशी संपर्क साधावा असे जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड श्री. अरविंद विद्यागर यांनी आवाहन केले आहे.

## शॉर्टसर्किट मुळे लागलेल्या आगीत गोठा भस्मसात बापुराव आजबे यांचे अडीच लाखांचे नुकसान

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील वाघिरा येथील रहिवासी बापुराव नरहरी आजबे यांचे लिंबागणेश येथील काळवाडी शिवारात गट नंबर २८० मध्ये शेतीजमिन असुन काल शार्टसर्कीटमुळे लागलेल्या आगीत त्यांचा गोठा आणि गोठ्यातील शेतीमाल कांदा, २ एक्करमधील गोळा केलेले ठिबक तसेच १ एक्कर मधील स्प्रिंकलर, शेतीकाम ासाठी आवश्यक आवजारे आणि सागवानाची झाडे यांचे एकुण जवळपास अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले असुन गोठ्याच्या जवळुन जाणाऱ्या विद्युत तारेच्या शार्टसर्कीटमुळे आग लागल्याचे शेतकरी बापुराव नरहरी आजबे यांनी म्हटले आहे. आज दि.१९ रोजी सकाळी त्यांचा मुलगा शेतावर घरी पाणी नेण्यासाठी आला असता गोठा आगीत भस्म सात झाल्याचे कळाले. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी संबंधित प्रकरणात फोटो आणि व्हिडिओ तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना पाठवुन आगीची कल्पना देत शेतकऱ्याशी फोनवरून बोलणे करून दिले. संबंधित प्रकरणात पंचनामा करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी यांना सुचना देतो असे तहसीलदार शेळके म्हणाले.



## पद्मपाणी राज्य राष्ट्रीय पुरस्कार जाहीर ; ४ मे रोजी होणार मान्यवरांच्या हस्ते थाटात वितरण

**बीड । प्रतिनिधी**

शहरात मागील १७ वर्षापासून संविधान दिनाच्या अनुषंगाने विविध क्षेत्रात भरीव काम करणार्या गुणवंत व्यक्तींना पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने पद्मपाणि राष्ट्रीय, राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाते.

या वर्षीच्या या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यासह राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून आपली आगळीवेगळी ओळख निर्माण करणार्या गुणवंत कर्तुत्ववान व्यक्तीच्या कार्याची दखल घेऊन प्रतिष्ठांच्या वतीने दिल्या जाणार्या विविध पुरस्कारांसाठी विविध क्षेत्रातील गुणवंत कर्तुत्ववान व्यक्तीची निवड करण्यात आली असून ०४ मे रोजी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये मान्यवरांच्या शुभहस्ते या पुरस्काराचा वितरण करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप तरकसे यांनी दिली.

यावर्षीच्या पुरस्कारांमध्ये पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्या पत्रकारांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे यामध्ये दै.लोकाशाचे निवासी उपसंपादक उत्तम हजारे, दै. रिपोर्टर बीडचे कार्यकारी संपादक गणेश सावंत, दै. पुढारी न्यूजचे बीड जिल्हा प्रतिनिधी उदय नागरगोजे, दै. लोकनायकच्या सह संपादिका नायरा राज मुळे, दैनिक दिव्य मराठीचे ब्यूरोचिप अमोल मुळे, साप्ताहिक आदर्श पोलखेलचे संपादक नितेश उपाध्ये यांना आदर्श पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणार्या समाजसेविक पुरस्कार मुंबई येथील समाजसेवक शाहिरा जाधव, बीड शहरातील ज्येष्ठ समाजसेविका सौ. सीमा ओस्तवाल मॅडम, जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्राचे राजू वंजारे, अभिजित वैद्य, जालना जिल्ह्यातील माधवराव नरसिंहराव पात्रे यांना उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

## अज्ञानातून प्रकाशाकडे जाण्याचे गीतेचे आत्मज्ञान बापुजींनी सत्संगातून दिले-दिलीप चरखा

### पूज्य संत श्री आशारामजी बापूजींचा ८९ वा अवतरण दिवस उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

पूज्य संत श्री आशाराम बापूजींनी सत्संगाद्वारे सर्व जाती धर्मातील लोकांना अज्ञानातून ज्ञान प्रकाशाकडे जाण्याचे गीतेचे आत्मज्ञान तत्वज्ञान सत्संगातून देऊन आत्म उन्नती केली असे प्रतिपादन दिलीपजी चरखा यांनी प्रभू कनकालेश्वराच्या पुण्य पावन भूमीत पूज्य संत श्री आशारामजी बापूजींचा ८९ व्या अवतरण दिवसानिमित्त आयोजित सत्संगा प्रसंगी बोलतांना केले. बीड येथील सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स पुज्य संत श्री आशारामजी बापू सत्संग मंदिर येथे मोठ्या उत्साहात सर्व साधक व साधिका यांच्या उपस्थितीत पूज्य संत श्री आशाराम जी बापूजींचा ८९ व्या अवतरण दिवस संपन्न झाला.



सत्संगा प्रसंगी पुढे बोलतांना दिलीप चरखा म्हणाले की, पूज्य बापूजी यांचे सर्व सत्संग संयम, सदाचार, चरित्र निर्माण व ब्रह्मचर्याचे समर्थन करणारे आहेत. पूज्य बापूजींनी व्हॅलेंटाईन डे मुळे होणारा विनाश पाहून त्याला पर्याय म्हणून मातृ-पितृ पूजन दिवस सुरू केला. १४ फेब्रुवारी व्हॅलेंटाईन डे दिवशी बहुराष्ट्रीय कंपनीचा भारतात ग्रीटिंग बुके व सर्व अश्लील साहित्याचा व्यापार आरबो खरबो रुपयांचा व्यवसाय होत होता यामुळे युवाधन बरबाद होत होते तसेच युवा पिढी माता-पित्याचा अनादर करत होती म्हणून पूज्य बापूजींनी मातृ पितृ पूजन दिवस १६८ देशांमध्ये सुरू केला. पूज्य बापूजींनी बाल संस्कार सेवा केंद्र चालू करून विद्यार्थ्यांना चांगले संस्कार, चांगले विचार यांचे बिजारोपण केले. पूज्य बापूजींनी करोडो लोकांचे दारू, मास, व्यसन सोडवून अनेक उध्वस्त कुटुंब सुखी, स्वस्थ व सन्मानित केले. आजची लॉर्ड मेकौली प्रणित शिक्षण पद्धती भारतीयांना परकीय गुलाम मानसिकता बनविणारी शिक्षण पद्धती आहे. पूज्य बापूजींनी हजारो कत्तलखान्यातील गाईंना वाचवून गोशाळा निर्माण केल्या. हॉस्पिटल मधील होणारा खर्च पाहून गोरगरीब लोकांचे आरोग्य चांगले राहावे म्हणून स्वस्त दरात आयुर्वेदिक औषधी निर्माण केल्या. पूज्य बापूजींचे लोक कल्याणकारी, सत्कर्म धर्मविरोधी लोकांना सहन झाले नाही आणि म्हणून ८९ वर्ष वयोवृद्ध संतावर अन्याय व अत्याचार हे भारतीय वैदिक संस्कृतीला तोडण्याचे जागतिक षडयंत्र आहे. पूज्य बापूजींनी १९९३ ला शिकागोच्या धर्मसभेला संबोधित केले आणि भारतीय वैदिक संस्कृतीचे आत्म ज्ञान व तत्वज्ञान याचा फायदा विश्वाने घेऊन सुखी.

## बीड जिल्हा लॅक्रोस टिम ने राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धे मध्ये प्रथम पारितोषिक पटकावले

**बीड । प्रतिनिधी**

नुकत्याच पुणे हडपसर येथील मैदानावर लेक्रॉस च्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र राज्य लेक्रॉस असोसिएशनचे सचिव डॉ.मोहम्मद बाबर , बीड जिल्हा लेक्रॉस असोसिएशनचे अध्यक्ष रामदास गिरी, माऊली ढवळे रोहित ढवळे महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातील पदाधिकारी व खेळाडू यांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन संपन्न झाले. लॅक्रोस हा खेळ २०२८ मध्ये ऑलम्पिक स्पोर्ट्स मध्ये खेळला जाणारा खेळ आहे. या लेक्रॉस च्या दुसऱ्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातील एकूण २५ संघाने सहभाग नोंदवला. जुनिअर गट अंडर १९ मुलींच्या बीड जिल्हा संघाने या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये अत्यंत उत्कृष्ट काम गिरी करत प्रथम पारितोषिक पटकावले. विजयी संघातील



खेळाडू जुनिअर गट मुली तनुजा हडुळे, सृती जाधव, गौरी नागपुरे, श्रावणी मुळे, सुहानी शिंदे, अदिती शिंदे, सिद्धी जाधव, अक्षता बंड, ज्ञानेश्वरी नागरगोजे या खेळाडूंना विशाल गिरी,अनंत जाधव ,रोहित ढवळे, संकेत वायकर, अमोल ढवळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. वरील खेळाडू पुढे आग्रा येथे होणाऱ्या लॅक्रॉस राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, द.बा.घुबरे पब्लिक स्कूलचे सचिव दीपक ( दादा) घुंमरे ,आदिंनी शुभेच्छा दिल्या.

दैनिक मराठवाडा पत्र दि. २०/०४/२०२५

**टि. सी. हरवले आहे.**

आशिष राजभाऊ पाखरे यांचा बारावी पास चा टि.सी. बीड ते पिंपळवाडी या प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

संपर्क क्रमांक – ९३५६४४७७९५



*तलवाडा येथील जेष्ठ पत्रकार शेख आतिखभाई यांचा वाढदिवस प्रतीवर्ष प्रमाणे यंदाही साजरा करतांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन सौदागर, बाळासाहेब डहाळे, जयदेव शिंगने, गोपाल जोशी, अजमत आली सय्यद व इतर*



*लग्न म्हणजे एक पवित्र बंधन.. दोन नात्यांची जन्मोजन्मींची गुंफण! धोंडराई येथील आमचे सहकारी मित्र श्री.सार्थक खरात यांची बहिण चि. सौ. का गायत्री व चिरंजीव अमर यांच्या शुभविवाह सोहळ्याच्या निमित्ताने उपस्थित राहून नव वधू वरांस पुढील वैवाहिक जीवनाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी उपस्थित अनेक ज्येष्ठ व युवा सहकाऱ्यांची भेट व हितगुज या विवाह सोहळ्याच्या निमित्ताने साधता आला.प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, दोन्ही परिवारातील नातेवाईक आप्तेष्ट व समवेत आलेले आदी युवा सहकारी उपस्थित होते.*

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३३९/२०२५**

**स. सरफराज विरूध्द निरंक**

अर्जदार - १. सय्यद सरफराज अजहर हुसेन, वय - ६३ वर्षे, धंदा - मजुरी, रा. बालेपीर आमराई, बीड, ता.जि. बीड. २. सय्यद अमानत हुसैन सय्यद अजहर हुसैन, वय - ८० वर्षे, धंदा- निरंक, रा. बालेपीर नगर रोड, बीड ता. जि. बीड. ३. बिस्मिल्ला अली हुसेन सय्यद, वय - ६० वर्षे, धंदा - मजुरी, रा. बालेपीर नगर रोड, बीड ता.जि. बीड. ४. अफसन हुसेन आगाजनी सय्यद, वय - ४४ वर्षे, धंदा - मजुरी, रा. मेडिकल कॅम्पस, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड. ५. शेख नफिसबेगम अजमतुल्ला, वय - ७० वर्षे, धंदा - निरंक, रा. बालेपीर नगर रोड, बीड ता. जि. बीड. ६. आसमा प्र. नदीम शेख, वय - ४५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. घर क्र. ७१६, बाबा बंगाली मस्जिद जवळ, अहमदनगर, ता. व जि. अहमदनगर. ७. रेशमा भ्र. उमर शेख, वय - ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. बालेपीर, बीड ता. जि. बीड.

**मागणी – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत खुर्शीद बेगम मीर सय्यद अजहर हुसेन मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत खुर्शीद बेगम मीर सय्यद अजहर हुसेन यांचा मृत्यु दिनांक २२/११/१९९५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत खुर्शीद बेगम मीर सय्यद अजहर हुसेन यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत खुर्शीद बेगम मीर सय्यद अजहर हुसेन यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ११/०६/२०२५ आहे.

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**

**(स्वाक्षरीत)** **क.लिपीक** **शिक्का** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**जाहीर प्रगटन**

**मा.श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश-४, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. : ३७४/२०२४**

अर्जदार- नसीम बेगम खलीलुल्ला हुसैनी, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. गेवराई, ता. गेवराई जि.बीड.

विरूध्द

गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी, बीड

अर्जदारातर्फे वकिल - ॲड. ए. बी. बांगर, बीड.

मागणी- अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण / विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार नसीम बेगम खलीलुल्ला हुसैनी, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. गेवराई, ता. गेवराई जि.बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराची अज्ञान मुले नामे १. अक्सा खलीलुल्ला हुसैनी, वय ०८ वर्षे ०२. कशप खलीलुल्ला हुसैनी, वय ०६ वर्षे, ०३. फैजान खलीलुल्ला हुसैनी, वय १६ वर्षे ही अज्ञान असुन अर्जदार ही त्याची अज्ञान पालनकर्ती आई आहे. अज्ञान अर्जदार याचे नावे मौजे गेवराई ता. गेवराई जि.बीड येथिल शेत जमीन सर्व्हे क्र. २०४ मधिल एकुण क्षेत्र १२ हे. ७४ आर असुन पोट खराब १४ आर पैकी अज्ञानाचे मालकीचे ०० हे ०२.७३ आर असुन ज्याचा प्लॉट नं.१६ ज्याची साईज पुर्व पश्चिम ६० फुट दक्षिणउत्तर २५ फुट सहन जागा आहे हि मिळकत असुन सदर मिळकत विक्री/हस्तांतरण करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे..

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक १७/१२/२०२४ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

प्रकरणातील पुढील तारीख : ०६/०२/२०२५.

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** **सहा. अधीक्षक**

**(स्वाक्षरीत)** **क.लिपीक** **शिक्का** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

CMYK

दैनिक **मराठवाडा पत्र**

● epaper.marathwadapatra.com

रविवार, दि.२० एप्रील २०२५ पान ४

## पंडीत प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन
## महादेव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील डॉक्टरांची व्यापक बैठक

**बीड । प्रतिनिधी**

२० व्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सिहोर येथील पंडीत प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन दि. ७ ते १४ जून २०२५ या कालावधीत श्री क्षेत्र चाकरवाडी येथे करण्यात आले आहे. या कार्यक्र माच्या नियोजनासाठी गुरूवार दि. २४ एप्रिल रोजी रविराज मंगल कार्यालय, एमआयडीसी रोड,बीड येथे सायंकाळी ५ वाजता शहरातील डॉक्टरांची व्यापक बैठक महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

शिवपुराण कथेच्या नियोजनासाठी आणि विविध समित्यांचे गठण करण्यासाठी श्रीक्षेत्र चाकरवाडी येथील महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व डॉक्टरांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये सर्वांच्या सहकार्याने पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवपुराण कथेचे नियोजन करण्यात येणार ▶▶ उर्वरित पान २ वर

# केवळ अडीच टक्का वनक्षेत्र असलेल्या बीड जिल्ह्यात मुख्यमंत्र्यांच्या हेलिपॅड साठी झाडांची कत्तल निषेधार्ह





**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात २.४ ईतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे.वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत झाडे लावा आणि झाडे जगवा मोठ्या प्रमाणावर जाहिरात बाजी करण्यात येते. मात्र आज दि.१९ शनिवार रोजी शिरूर कासार तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथे वैराग्यमुर्ती संत वामनभाऊ महाराज यांच्या ९३ वा नारळी सप्ताह सांगता निमित्ताने समारोप प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हेलिकॉप्टरने आगमन झाले.यावेळी हेलिपॅड तयार करण्यासाठी १५-२० वर्षांपूर्वीची लहानमोठी १६ झाडांची कत्तल करण्यात आली. याबद्दल वृक्षप्रेमी आणि पर्यावरण प्रेमीमध्ये संतापाची लाट उसळली असुन झाडे जगवा आणि झाडे लावा असा लाखों रूपयांच्या जाहिरातीद्वारे संदेश देणा-या सरकारला हेलिपॅडची जागा बदलुन झाडे वाचवता आली नसती का?? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असुन एरवी वृक्षतोडीसाठी सर्वसामान्य माणसाला दंडाची भाषा करणारे सरकार, लोकप्रतिनिधींसाठी वेगळे नियम आणि कायदे आहेत का?? या वृक्षतोडीसाठी वनविभागाकडून रितसर परवानगी घेण्यात आली होती का?? असा सवाल करत संबंधित प्रकरणात चौकशी करून झाडे तोडणा-या जबाबदार अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## नगरपालिका प्रशासक मुख्याधिकारी सीईओ यांनी बीडकरांना मुबलक पाणी उपलब्ध करून द्यावे: नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिका व प्रशासक व मुख्याधिकारी सीईओ नीता अंधारे मॅडम बीड करांचे पाण्याविना हाल होत आहेत. आपल्याला थोडी दया येऊ द्या आणि बीडकरांना मुबलक असे पाणी उपलब्ध करून द्या . बिघडलेले हातपंप बोरवेलस आहेत ते दुरुस्त करा ज्या विहिरीम ध्ये गाळ आहे ते गाळ काढण्याचे काम प्रशासनाच्या मार्फत करा तथा बीड शहरांमध्ये टँकर द्वारे पाणीपुरवठा ज्या ज्या ठिकाणी करता येत असेल त्या त्या ठिकाणी आपल्या अधिकाऱ्याच्या व कर्मचाऱ्याच्या मार्फत सर्वे करून माहिती घ्या आणि बीड शहरामध्ये अनेक ठिकाणी अनेक प्रकारचे मुके जनावरे रस्त्यावर फिरत असतात मग गाय असो शिळी असो बैल असो किंवा कुत्रे असोत यांची पाण्याच्या बाबतीत आपण दक्षता घेऊन अशा मुक्या जनावरांचा तरी आशीर्वाद घ्या आपण ठिकठिकाणी पानवट्या ठेवून त्याच्यामध्ये या मुक्या जनावरांसाठी नगर प्रशासनाच्या वतीने पाणी उपलब्ध करून द्या सध्या उन्हाची तीव्रता दिवसान



दिवस वाढत असून कोणाचा पारा चढत आहे माणसाला साडेदहाच्या नंतर बाहेर येणे देखील मुश्किल झाले आहे मग अशा मुक्या जनावरांना देखील पाण्याविना भटकंती करावी लागत आहे म ुक्या जनावराची तरी आपल्याला दया येऊ द्या आणि नागरिकांसह मुक्या जनावरांना देखील कसे पाणी उपलब्ध मुबलक करून देता येईल याची व्यवस्थापन एक नगरपालिकेचे कर्तव्यदक्ष सि ई ओ म्हणून करा जेणेकरून लोकांच्या मनामध्ये तुमच्याविषयी एक उत्कृष्ट सीईओ म्हणून भावना निर्माण होईल आणि तुमचा आदर्श इतर जिल्ह्यातील प्रशासनातील अधिकारी यांनी नक्की घेण्यासारखा आपण असा आदर्श निर्माण कराल असी अपेक्षाही यावेळी बीड

▶▶ उर्वरित पान २ वर

## बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले विरोधात प्रशासनाकडून परळी पोलिसात फिर्याद

**निवडणूक प्रक्रियेत परळीत ड्युटी नसताना खोटे आरोप करत खळबळ माजवल्या प्रकरणी गंभीर गुन्हे दाखल**

**परळी । प्रतिनिधी**

परळी विधानसभेच्या निवडणूक प्रक्रियेत किंवा मतमोजणी तसेच ईव्हीएम च्या सुरक्षेच्या संदर्भात कोणतीही ड्युटी नसताना, केवळ खळबळ माजवण्याच्या उद्देशाने खोटे, चुकीचे आरोप करणाऱ्या बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याच्या विरोधात परळीचे तहसीलदार (निवडणूक) यांनी परळी पोलिसात फिर्याद दिली असून, कासले विरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याला निवडणूक, ईव्हीएम मशीन सुरक्षा किंवा मतमोजणी दरम्यान कुठेच परळी विधानसभा मतदारसंघात ड्युटी दिलेली नव्हती. ईव्हीएम मशीनची सुरक्षा केंद्रीय राखीव पोलीस बल व राज्य राखीव पोलीस दलाचे जवान यांच्या देखरेखीत व पूर्णवेळ सीसीटिव्ही कॅमेरे मध्ये झाली होती. त्यास निवडणूक निरीक्षक तसेच सर्वपक्षीय उमेदवार प्रतिनिधी साक्षीदार आहेत.

मात्र तरीही कासले याने समाज माध्यमांवर व्हायरल केलेल्या व्हिडिओच्या माध्यम ातून आपल्याला ईव्हीएम ड्युटी होती, तिथे ड्युटीवर गप्प राहायचे यासाठी मला दहा लाख रुपये देण्यात आले, असे चुकीचे आरोप करत लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी, राज्य सरकार यावर शंका निर्माण होऊन कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण व्हावा त्याचबरोबर निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह व बदनामी तसेच सह देशाच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना अन्न पदार्थांमधील भेसळ ओळखण्याचे प्रशिक्षण

**आदित्य शिक्षण संस्थेचा उपक्रम : विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग, बीड, छत्रपती संभाजीनगरच्या तज्ज्ञांकडून मार्गदर्शन**

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अन्न पदार्थांमधील भेसळ ओळखता यावी यासाठी संस्थेच्या वतीने एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्यामध्ये बीड आणि छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



करून पत्येक्ष अन्न पदार्थांमधील भेसळ कशी ओळखावी यासाठी प्रात्यक्षिक करून दाखवले.

▶▶ उर्वरित पान २ वर

## बुलढाणा अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष माननीय राधेश्यामजी चांडक (भाईजी यांना मिळालेली पुरस्काराची रक्कम केली गोशाळेसाठी दान

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे बुलढाणा बँकेचे संस्थापक अध्यक्ष माननीय राधेश्यामजी चांडक (भाईजी )यांना सहकार क्षेत्रातील अतिशय उत्तम कामगिरी त्यांनी केल्यामुळे बीड येथे काही दिवसापूर्वी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित दादा पवार यांच्या शुभ हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये लोकाशा भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते त्यामध्ये त्यांना सन्म ानपत्र स्मृतिचिन्ह व रोख एक लाख रुपये देऊन राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला होता.

याप्रसंगी माननीय सहकार महर्षी



राधेश्यामजी चांडक (भाईजी ) यांनी मनोगत व्यक्त करताना जी रोख रक्कम एक लाख रुपये देण्यात आली होती त्यामध्ये अजून स्वतःचे २५ हजार रुपये देऊन बीड येथे गोसेवेचे कार्य करणारी साध्वी प्रीतीसुधाजी गोरक्षण केंद्र नामलगाव फाटा येथे ही रक्कम देण्याची त्यांनी घोषणा केली . त्याप्रमाणे आज त्यांनी २९ क्विंटल सरकी पेंड देऊन त्यांनी एक आदर्श निर्माण केला .या कौतुकस्पद निर्णयामुळे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे स्वतःच्या संस्थेची बुलढाणा येथे त्यांची गोशाळा आहे आपल्या गोशाळेला ही रक्कम न देता बीड येथे अतिशय उत्कृष्ट दर्जाची सेवा साध्वी प्रीतीसुधाजी गोरक्षण केंद्राच्या माध्यमातून केली जाते .येथे असलेल्या २०० पेक्षा जास्त गोमाते करिता त्यांनी आज २९ क्विंटल सरकी पेंड देऊन आदर्श निर्माण केलेला आहे ▶▶ उर्वरित पान २ वर

## गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांचा सपत्नीक सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय देवनारायणच्या सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याने जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांचा सपत्नीक सत्कार मौजे भाळवणी येथे ग्रामस्थांकडून करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी सत्काराला उत्तर देतांना रतन गुजर म्हणाले की, गुजर समाज एक संघ व्हावा, संघटित व्हावा, गुजर समाजाचे प्रश्न प्रशासनाकडे मांडण्यासाठी मी नेहमी तत्पर राहील. समाज बांधवांचा एकमेकांशी संपर्क कमी असल्याने आपण एकटे समजू लागलो लवकरच एकसंघ सर्वांचा मेळावा आयोजित करण्याचा विचार आहे. या सत्कार समारंभाला राम देवराव मामा दहे, माजी सरपंच दादाराव बहिरवाळ, नाना मस्के, मांडवगळीचे चेअरमन माजी सरपंच मुके पाटील, लहू दहे, बंडाने दाजी, अंकुश दहे, बाळू दहे, गोविंद खिलारे व पंचक्रोशीतील सर्व सम ाज बांधव उपस्थित होते.



## तेलगाव वीज उपकेंद्रात भीषण आग

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील वीज उपकेंद्रातील ५ एमव्हिए पावर ट्रान्सफार्मर ला शुक्रवारी सायंकाळच्या वेळी अचानक आग लागली. या आगीमुळे तेलगावसह परिसरातील सहा ते सात गावचा वीज पुरवठा बंद झाला असून तीन दिवस विज पुरु वठा बदं च राहण्याची शक्यता आह. दरम्यान या आगीने वीज कंपनीचे लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे.

आग आटोक्यात आणण्यासाठी लोकनेते सोळंके कारखान्यासह वडवणी, माजलगाव येथील अग्निशमन बबं आले हाते .दाने तास चालु असलल्या आगीमुळे अकाशात धुरांचे लोटच्या लोट दिसत होते. खुपच भयानक आग होती. तेलगाव येथील

विज कं पनीच्या ३३ड के .व्हि.विज उपकें द्रातील पाच एमव्हिए पावर ट्रान्सफार्म र मध्ये शकु वार सायकं ाळच्या वेळी पाच वाजण्याच्या सुमारास अचानक मोठ माठे आवाज हाऊे न, या ट्रान्सफार्म र ने काही क्षणातच पेट घेतला. तेथे ड्युटीवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात येण्याच्या आतच भयानक आग लागली. त्यामुळे ड्युटीवरील कर्मचाऱ्यांना काय करावे. लक्षात येईना. त्याच वेळी विज कर्मचाऱ्यांनी लोकनेते सुंदररावजी सोळंके कारखान्याच्या अग्नीशमन बंबास पाचारण केले. हाहा म्हणता आगीने रौद्र रूप धारण केल्याने ▶▶ उर्वरित पान २ वर

# अहो आमदार महोदय गावात पुढारीपण टार्गेटवर शहाणपण

- राष्ट्रवादीच्या पुढार्यांकडून सामान्य कार्यकर्त्यांचे राजकारण उध्वस्त करण्याचा डाव
- राजकीय पडद्यामागील खेळीचा किंग कोण शोधा ?
- गावाच्या बेशिस्त राजकारणाबाबत आ.विजयसिंह
- पंडित यांची लवकरच भेट घेणार : पत्रकार नवनाथ आडे

ग्रामीण भागात अंतर्गत संघर्ष उफाळून येणार ?

**गेवराई । प्रतिनिधी**

प्रत्येक माणसांनी राजकारण करावे परंतु त्या राजकारणापासून कुणालाही जाणीवपूर्वक टार्गे ट केल्यासारखं करू नये, आपापल्या पक्षांसाठी किंवा आपल्या नेत्यांसाठी राजकारण करण्याचा हा अधिकार आहे. परंतु या राजकारणाच्या पडद्याम ागे राहून कोमलवाडी येथील काही नेत्यांच्या मागे बगलबच्चे फिरणारे राजकीय पुढारी यांनी एका पत्रकाराच्या कुटुंबाला राजकीय दोषातून टार्गेट करण्याचें काम करत असल्याचे पाहायला मिळत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांसह गाव पुढाऱ्यांचा ग्रामीण भागात सुरु झालेला अंतर्गत संघर्ष उफाळून वर आला आहे. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना त्रास दिला जात असल्याची तक्रार सम ोर येत असल्याने मोठी खळबळ उडाली आहे त्यामुळे कार्यकर्त्यात ह्या गोष्टी घडत गेल्या तर येणाऱ्या काळांत निवडणुकीमध्ये अनेक अडचणी निर्माण होतील. आणि याचा फटका पक्षाला निश्चितपणे बसेल. सातत्याने अफवाचा डिंगोरा पेटवत गावाच्या वेशीवर बसत स्वतःला शहाणा समजतात व पांढऱ्या कपड्याच्या पुढार्यांना आता विकासाच्या ऐवजी सामान्य घरातील एका पत्रकार बांधवाला टार्गेट करण्याचा हेतू गावचा विकास केल्यासारखे वाटतो का? असा प्रश्न पडतो म्हणून ज्या सामान्य कुटुंबातील पत्रकार कार्यकर्त्यांने नेत्यांला निवडून आणण्यासाठी

▶▶ उर्वरित पान २ वर

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे
वॉटर कलर, सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. योगेश वाघीरे
९१४६७०२३२३
८१४९८०००२०
-: पत्ता : -
राष्ट्रवादी भवनसमोर,
बार्शी रोड, बीड.

CMYK